**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा तसेच युरोपियन कमिशनच्या अध्यक्ष उर्सुला वॉन डेर लेयन यांच्यासोबत संयुक्त दूरध्वनी संवाद (04 सप्टेंबर 2025)**

04 सप्टेंबर 2025

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्ष उर्सुला वॉन डेर लेयन यांच्यासोबत संयुक्तपणे दूरध्वनी द्वारे चर्चा केली.

2. जगातील सर्वाधिक मोठ्या लोकशाही शक्ती म्हणून, भारत आणि युरोपियन युनियन यांच्यात विश्वास, सामायिक मूल्ये आणि भविष्याचा समान दृष्टिकोन या आधारावर दृढ आणि घनिष्ठ नाते संबंध राहिले आहेत. नेत्यांनी भारत युरोपियन युनियन धोरणात्मक भागीदारीचे महत्त्व अधोरेखित केले. यामुळे जागतिक समस्यांना संयुक्तपणे सामोरे जाणे, स्थिरता वाढवणे आणि परस्पर समृद्धीसाठी नियम-आधारित व्यवस्थेला प्रोत्साहन देणे शक्य होईल.

3. नेत्यांनी व्यापार, तंत्रज्ञान, गुंतवणूक, नवोपक्रम, शाश्वतता, संरक्षण, सुरक्षा आणि पुरवठा साखळी स्थिरता यासारख्या प्रमुख क्षेत्रांमध्ये द्विपक्षीय संबंधातील प्रगतीचे स्वागत केले. भारत- युरोपियन युनियन मुक्त व्यापार कराराच्या वाटाघाटी लवकर पूर्ण करण्यासाठी तसेच आयएमईईसी कॉरिडॉर अंमलबजावणी व्हावी यासाठीची सामायिक बांधिलकीचा पुनरुच्चार केला.

4. फेब्रुवारी मध्ये युरोपियन युनियन कॉलेज ऑफ कमिशनर्सच्या पार पडलेल्या ऐतिहासिक भारत भेटीच्या आधारावर, आगामी भारत युरोपियन युनियन शिखर परिषदेचे आयोजन भारतात परस्पर सोयीच्या तारखेला करण्याबाबत उभय नेत्यांमध्ये चर्चा पार पडली. पंतप्रधान मोदींनी या शिखर परिषदेसाठी उभय नेत्यांना भारत भेटीचे निमंत्रण दिले. पंतप्रधान मोदींनी उभय नेत्यांना त्यासाठी भारतात आमंत्रित केले.

5. नेत्यांनी युक्रेनमधील संघर्ष संपवण्याच्या प्रयत्नांसह परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवरही विचारांची देवाणघेवाण केली. पंतप्रधान मोदींनी संघर्षाचे शांततापूर्ण मार्गाने समाधान आणि लवकरच शांतता आणि स्थिरता पुनर्स्थापित करण्यासाठी भारताच्या सातत्यपूर्ण पाठिंब्याचा पुनरुच्चार केला.

6. नेत्यांनी परस्पर संपर्कात राहण्यावर सहमती दर्शविली.

**नवी दिल्ली**

04 सप्टेंबर 2025